MHPU170007682026

## <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०६/२०२६ मधील नि. १ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे **विकास बाळासाहेब मस्के** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ आणि गौण खनिज अधिनियम १९५७ चे कलम २१(४ए) प्रमाणे <u>अशोक लेलंड कंपनीचा बडा दोस्त वाहन क्र.एम.एच.४५/ए.एफ.६५३१</u> चा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार हा सदर वाहनाचा मालक आहे. सदरचे वाहन तहसिल कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर यांनी गौण खनिज अधिनियमचे तरतुदी अंतर्गत जप्त केलेले आहे. अर्जदारने प्रस्तुत अर्जाव्दारे सदर वाहनाचा ताबा त्याला देण्याची विनंती केली आहे.

०२. सदरकामी सहा. सरकारी वकील व गैरअर्जदार म्हणजे तहसिलदार, इंदापूर यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, सदर वाहनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम अंतर्गत तसेच गौण खनिज अधिनियम अंतर्गत कार्यवाही प्रस्तावित असुन अर्जदाराकडून दंडाची व शास्तीची रक्कम वसुल झाल्याशिवाय अर्जदारास वाहन परत करण्यात येवु नये.

०३. निशाणी ३/१ कडील वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दादासाहेब खंडाळे हा प्रस्तुत वाहनाचा मुळ मालक आहे. निशाणी ३/३ कडील वाहन खरेदी पत्राच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दादासाहेब खंडाळे यांनी सदर वाहन रेहान मुलाणी यास विक्री केले. निशाणी ३/४ कडील वाहन खरेदी पत्राच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले

असता असे दिसून येते की, रेहान मुलाणी यांनी सदर वाहन विकास यमगर यास विक्री केले आहे. निशाणी ३/५ कडे अर्जदार यांनी विकास यमगर यांचेकडून वाहन खरेदी केलेचे इसार पावती दाखल केले आहे. दाखल कागदपत्रावरुन अर्जदार हा सदर वाहनाच्या कब्जास हक्कदार असल्याचे स्पष्ट आहे. सदर वाहन तहसिल कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर येथे पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता आहे म्हणून अर्जदारास सदर वाहन योग्य त्या अटी व शर्तींवर सुपुर्दनाम्यावर परत मिळण्याचा हक्क आहे. तहसिलदार यांच्या म्हणण्यातुन जप्त वाहनाच्या अनुषंगाने जमिन महसुल अधिनियम अंतर्गत कलम ४८ अन्वये तसेच गौण खनिज अधिनियम अंतर्गत दंडाची व शास्तीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे असे दिसुन येते. त्यामुळे माननीय उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांच्या ***अमोल वजे –वि– महाराष्ट्र शासन क्रि.रिट पिटीशन क्र. १५१६/२०१८ निकाल तारीख २१.०१.२०१९*** मधील न्यायनिर्णयातील निष्कर्षानुसार प्रस्तुत अर्जातील वाहनाचा ताबा अर्जदारास तहसिलदार यांनी सुरु केलेल्या कार्यवाहीनुसार दंडाच्या व शास्तीच्या रक्कमेचा भरणा केल्याशिवाय देता येणार नाही.

०४. अर्जदारच्या विधीज्ञांनी या ठिकाणी ***मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा एकल पीठाचा मंगेश शिंदे विरुध्द महाराष्ट्र सरकार दिनांक ११/०९/२०१९*** मधील न्यायनिवाड्याचा दाखला दिला. सदर न्यायनिवाड्यामध्ये मा.औरंगाबाद खंडपीठाने असा निष्कर्ष नोंदविला की, तहसिलदार यांनी सुरु केलेल्या कार्यवाहीनुसार दंडाच्या व शास्तीच्या रक्कमेचा भरणा करण्याबाबतची अट घालणे योग्य व न्यायसंगत नाही.

०५. ***मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे वर नमुद अमोल वजे व मंगेश शिंदे*** या दोन्ही प्रकरणातील निर्णय हे एकल पीठाचे व परस्पर विरोधी आहेत. अशा परिस्थितीत जर नंतरच्या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने आधीच्या निर्णयाचा विचार केला असेल व त्या निर्णयाबाबत चर्चा केली असेल तर सदर नंतरच्या निर्णयाचे

पालन करणे बंधनकारक आहे. जर नंतरच्या निर्णयामध्ये पुर्वीच्या निर्णयाबाबत विचार केला गेला नसेल तर पुर्वीचा निर्णय पाळणे बंधनकारक आहे. मा.औरंगाबाद खंडपीठाच्या वर नमूद मंगेश शिंदे या प्रकरणातील निर्णयामध्ये पुर्वीच्या वर नमूद अमोल वजे या निर्णयाचा विचार केला गेलेला नाही. अशा परिस्थितीत या न्यायालयास वर नमूद अमोल वजेच्या निर्णयातील निष्कर्षाचे पालन करणे बंधनकारक आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणात तहसिलदार यांनी सुरु केलेल्या कार्यवाही प्रमाणे दंडाच्या रक्कमेचा भरणा केल्याशिवाय अर्जदारास वाहन परत देण्यात येवू नये अशी अट घालणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

०१. गैरअर्जदार यांनी जप्त मुद्देमाल वाहन अशोक लेलंड कंपनीचा बडा दोस्त वाहन क्र.एम.एच.४५/ए.एफ.६५३१ हे अर्जदारास खालील अटी व शर्तींवर सुपूर्दनाम्यावर परत देण्यात यावे.

अ. अर्जदाराने रक्कम रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) चा सुपूर्दनामा लिहून द्यावा.

ब. अर्जदाराने सदर वाहनाची विक्री कोणासही करु नये अथवा त्यामध्ये कोणत्याही त्रयस्थ इसमाचा कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार प्रस्थापित करु नये आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये.

क. अर्जदारने सदर वाहनाचा उपयोग पुन्हा कोणत्याही प्रकारचा गुन्हा करण्याकरीता करु नये.

ड. गैरअर्जदार यांनी सुरु केलेल्या दंडात्मक कार्यवाहीनुसार दंडाच्या रक्कमेचा भरणा केल्याशिवाय अर्जदारास सदर वाहन परत करण्यात येवु नये.

इ. अर्जदाराने न्यायालय ज्यावेळेस आदेश देईल त्यावेळेस चौकशीचे कामी सदर वाहन हजर करावे.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.07.09 17:57:39 +0530

इंदापूर .
दिनांकः ०९/०७/२०२६

(प्र.चं.बारटक्के)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.